महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्ताने हैद्राबाद येथे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यास व त्यावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२०५(E-१७१०२८९)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ जुलै, २०२६

वाचा :- १. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./ १४७१, दिनांक २९ एप्रिल, २०२६.
२. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./ २२४१, दिनांक १४ जुलै, २०२६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्राची समृध्द सांस्कृतिक परंपरा, साहित्य, संगीत व कलेचा वारसा महाराष्ट्राबाहेरही जपला जाण्यासाठी तसेच हैद्राबाद व तेलंगणा येथील मराठी बांधवांना महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होईल. या उद्देशाने महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्ताने “लाभले आम्हास भाग्य” हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चास मान्यता देण्याची विनंती संचालनालयाने त्यांच्या उक्त संदर्भाधिन पत्रान्वये केली होती. त्यानुसार, सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व त्यावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्ताने दि. ०३ मे, २०२६ रोजी रवींद्र भारती सभागृह, हैद्राबाद येथे “लाभले आम्हास भाग्य” या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी करण्यात आलेला खर्च रुपये ८,००,०००/- (रुपये आठ लक्ष फक्त) इतक्या निधीस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर खर्च लेखाशिर्ष “मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम लेखाशीर्ष (२२०५ १५०७) - ५० इतर खर्च (कार्यक्रम)” या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

०३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर कार्यक्रमासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर संचालकांनी एक महिन्याच्या आत कार्यक्रम खर्चाच्या सविस्तर तपशीलाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

०५. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०७१७१७२३३३७१४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP SOPAN SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, 2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.07.17 18:02:04 +05'30'

(दिलीप सो. सोळसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवड नस्ती, सां.का.४